# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/03/2023 (मंगळवार) दुपार


---

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा बोरडा शिवार ता. रामटेक येथे दिनांक १२.०३.२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक १३.०३.२०२३ चे ०९.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— मनोज रंजित तागडे, वय ४७ वर्ष, रा. न्यु कोराडी वार्ड नं. १ प्लॉट नं. २८ वंजारी भवन कोराडी ता. कामठी जि. नागपुर यांची नमुद घटनास्थळावरील ऐजेक्स कंपनीची सिमेंट कॉक्रेट मशिन बोरडा ता. रामटेक शिवारात ऐरिगेशन च्या कामाकरिता लावली होती. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादीने साईड वर जावुन बघीतले असता मशिन क्र. MH 40 BJ 7733 हिच्या मधुन मिटर आणि प्रिंटर किंमती अंदाजे ४०,०००/— रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि खोब्रागडे पो.स्टे. रामटेक मो.नं. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील जिल्हा परीषद शाळा निंबा येथे दिनांक ९/०३/२०२३ चे १७.०० वा ते १०/०३/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— छाया कमलाकर ठाकरे, वय ५६ वर्ष, रा. पारशिवनी या जिल्हा परीषद शाळा निंबा येथे मुख्याध्यापक असुन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे शाळेतील आवारात ठेवलेले १) मेरी गो राऊंड साहीत्य किंमती अंदाजे ७५००/— रू व २) सी. सा. साहीत्य ३५००/— रू असा एकुण ११०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रभाकर मो. नं. ८८०६३५४३६३ हे करीत आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०१ कि. मी अंतरावरील जोगीठाणा पेठ उमरेड येथे दिनांक ०५/०१/२०२३ ते दिनांक १३/०३/२०२३ पावेतो यातील फिर्यादी नामे– सौ. निशा पंजाबराव बोबडे, वय १९ वर्ष, रा. जोगीठाणा पेठ उमरेड हि आपले मोबाईल वर इंस्टाग्राम वापरत असतांना तिची ओळख आरोपी नामे– किरण उर्फ कुणाल महादेव शिंदे, रा. पुणे यांच्या सोबत झाली त्यांचे फोनवर बोलणे झाले तेव्हा त्याने तो खडकी रोड पुणे येथे आर्मी मेडीकल कोअर मध्ये क्लर्क असुन ६३,०००/– रू पगार आहे व खडकवासला पुणे येथे ५५,००,००० /–रू. चा फ्लॅट आहे तसेच लातुर जिल्हयात ५ एकर शेती असुन त्यात साग व चंदनाचे झाडे असल्याचे सांगीतले. तो अनाथ असुन सिंधुताई सपकाळ अनाथालय मांजरी रोड पुणे येथे शिक्षण घेवुन मोठा झाल्याचे फिर्यादीसोबत लग्न करायचे आहे. फिर्यादीच्या आई वडिलांना भेटायला उमरेड येथे येतो असे सांगुन त्याने आई वडिलांसोबत बोलणे केले. दि १९/०१/२०२३ रोजी फिर्यादीच्या घरीच साक्षंगध केले तेव्हा पासुन तो उमरेड येथे फिर्यादीचे घरीच थांबुन दि १२/०२/२०२३ रोजी भवानी माता मंदीर उमरेड येथे फिर्यादी सोबत लग्न केले दि ११/०३/२०२३ रोजी फिर्यादीचे आईचे फोनवर आरोपीची पहीली पत्नी नामे– करिष्मा चापेकर रा. पुणे हिने फोनवर सांगीतले की, तिचे किरण महादेव शिंदे याचेसोबत लग्न आधीच झाले असुन त्याच्यापासुन एक ४ वर्षाचा मुलगा आहे व त्याच्या लग्नाचे फोटो व्हाटसॲप वर पाठवले. फिर्यादी व तिचे नातेवाईक यांनी विचारपुस केली असता आणखी एक लग्न करून तरूणीची फसवणुक केली असुन त्याबाबत पोस्टे अंबरनाथ ठाणे शहर येथे गुन्हा नोंद आहे. आरोपी याने फिर्यादीस आर्मी मध्ये असल्याचे खोटे सांगुन ऑटो व मजकुर दाखवले, आर्मीचे बनावट नियुक्तीपत्र, बदली झाल्याचे बनावट पत्र, लोनचे खोटे नावाचे प्रमाणपत्र, एआरओ पुणे चे बनावट पत्र असे एकुण ४ बनावट कागदपत्रे दाखवुन त्याचे सोबत असलेला आर्मीचा बेल्ट निळया रंगाची टोपी ईडियन आर्मी लिहीलेली टोपी ४ एएमसी लिहीलेले बॅच आर्मीची टॅट पी कॅप व K M SINDE कापडी नावाची बॅच चे कपडे असे दाखवुन व ६३०००/– रू पगाराची पुणे खडकी येथे आर्मीमध्ये नोकरी करीत असल्याचे खोटे सांगुन फिर्यादीसोबत लग्न करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम १७०, १७१, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४६९, ४७१, ४९४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि खोटेले सा. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**